**५) सामान्य प्रश्न:-**

**अ) हक्कदारी**

**ब) प्रकल्प मान्यता**

**क) जलप्रशुल्क**

**ड) सामान्य प्रश्न**

**१) हक्कदारी:-**

**१) शेतकरी स्वत: साठी शेतीच्या पाण्याची हक्कदारी कशी ठरवितो ?**

उत्तर :- शेतकरी जो पाणीवापर संस्थेचा सदस्य आहे त्याचा वाटा हा पाणीवापर संस्थेच्या पाण्याची हक्कदारीमधील एक भाग असतो. हा वाटा पाणीवापर संस्थेच्या चालू वर्षाच्या अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार बदलू शकतो. हा वाटा शेतकऱ्याची धारण जमिनीस पाणी वापर संस्थेच्या हक्कांचे पाणीवापराचे युनिट ( किंवा प्रति हेक्टरी हक्कदारी ) यास गुणून येते. अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणासाठी संबंधित शेतीच्या हक्कदारीची संबंधीत वर्षाची नोंदवही पहावी. यासाठी शेतकरी त्याच्या संबंधित पाणीवापर संस्थेशी सुध्दा संपर्क साधू शकतो.

**२) पाणीवापर संस्थेच्या पाण्याची हक्कदारी कशी काढली जाते ?**

उत्तर :- कृपया अनुज्ञेय हक्कदारी व वाटा यांची व्याख्या पहावी. म.ज.नि.प्रा.च्या व्हेबसाईटवरील हक्कदारी कलमामध्ये यासंबंधीचा तपशील उपलब्ध आहे. कृपया हक्कदारीची नोंदवही पहावी.

**३) पाणीवापर संस्थेची हक्कदारी कशी काढली जाते ?**

उत्तर :- प्रत्येक प्रकल्पाच्या हंगामानिहाय हक्कदारी परिगणना तक्ता हक्कदारी नोंद वहीमध्ये उपलब्ध आहे ती कृपया पहावी.

**४) शेतकरी त्याच्या हक्कदारी पास मिळविण्यासाठी कशाप्रकारे आवेदन करु शकतो?**

उत्तर :- शेतकरी हंगाम सुरु करण्यापूर्वी संबंधित पाणीवापर संस्थेला आवेदन सादर करु शकतो किंवा पाणीवापर संस्थेने आवेदन सादर करण्याची सूचना निर्गमित केल्यावर करु

शकतो. तद्‌नंतर संबंधित पाणीवापर संस्था त्याच्या आवेदनाचे उत्तर म्हणून त्यास हक्कदारी पास प्रदान करते.

**<u>प्रकल्पास मान्यता</u>:-**

**१) प्रकल्पास पर्यावरणाची मान्यता प्राप्त झाली नसतानाही म.ज.नि.प्रा.स नदीखोरे अभिकरण प्रकल्प मान्यतेस सादर करु शकते का?**

उत्तर :- होय, नदीखोरे अभिकरण मजनिप्रा च्या मान्यतेसाठी प्रकल्प सादर करु शकते. मजनिप्रा फक्त पाण्याची उपलब्धतता व अनुशेष या दोन निकषांचे आधीन राहून प्रकल्पास मान्यता देते. परंतु अंतीम प्रशासकीय मान्यतेपूर्वी पर्यावरणाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

**२) एखादयास एका ठराविक प्रकल्पाच्या मान्यतेसंदर्भात तपशिलात माहिती कोठे मिळेल ?**

उत्तर :- या व्हेबसाईटमधून प्रत्येक प्रकल्पाची उपलब्ध माहिती पाहता येऊ शकेल. त्यासाठी कृपया प्रकल्प मान्यता नोंदवही पहावी. पुढील तपशिलासाठी जलसंपदा विभागाशी संपर्क साधावा.

**<u>जलप्रशुल्क</u>:-**

**१) वैयक्तिक हक्कदारीच्या जल प्रशुल्क संबधात उपभोक्ता स्वतंत्रपणे मजनिप्रा.स संपर्क साधू शकतो का ?**

उत्तर :- नाही, मजनिप्रा फक्त मोठया प्रमाणात पाणी वापराच्या जल प्रशुल्काशी संबंधित आहे. म्हणून केवळ मोठया प्रमाणात वापरकर्ते व मजनिप्रा.स संपर्क साधू शकतात.

**२) मोठया प्रमाणात पाण्याचे प्रशुल्क कसे काढले जाते ?**

उत्तर:- मोठया प्रमाणात पाणी वापराचे प्रशुल्काचे विनियमन सध्या तयार करण्यात येत आहे. यासाठी कृपया जल प्रशुल्क हे कलम पहावे.

**३) मोठया प्रमाणात पाणी वापराचे प्रशुल्क कधीही बदलू शकतात का ?**

उत्तर:- मोठया प्रमाणात पाणीवापराचे प्रशुल्क दर तीन वर्षानी सुधारले जाते.

**<u>सामान्य प्रश्न:-</u>**

**१)    मोठया प्रमाणात पाण्याचा वापरकर्ता कोण ?**

उत्तर :- मोठया प्रमाणात पाण्याचा वापरकर्ता जो त्याच्या उपयोगासाठी किंवा त्याच्या अंतर्गत असलेल्या लाभधारकांसाठी जो जलाशय/ कालव्यातून थेट पाणी उचलतो, तो होय.

**२)    सिंचनासाठी लागणाऱ्या मोठया प्रमाणातील पाण्याचे वापरकर्ते कोण आहेत?**

उत्तर:- पाणी वापर संस्था हया सिंचनासाठी वापरणाऱ्या मोठया प्रमाणात पाण्याचे वापरकर्ते आहेत.

**३)    घरगुती/पाण्याचे मोठया प्रमाणात वापरकर्ते कोण आहेत ?**

उत्तर:- महानगरपालिका/नगर परिषदा/ ग्रामपंचायत/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इ. आहेत.

**४)    औद्योगिक पाण्याचे मोठया प्रमाणात वापरकर्ते कोण आहेत ?**

उत्तर:- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व इतर औद्योगिक संस्था/मोठे उद्योगधंदे सहकारी साखर कारखाना, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण, नागपूर इ.

**५)    नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत कोणते ?**

उत्तर:- नदी-नाले, नैसर्गिक तळी, सरोवर आणि त्यासारखे पाण्याचे साठे हे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आहेत.

**६)    जलसंपदा यंत्रणा म्हणजे काय ?**

उत्तर:- जलसंपदा यंत्रणा ही जलस्त्रोत वापरासाठी निर्माण केलेली व कार्यान्वित असलेली यंत्रणा होय. धरण, जलाशय, कालवे आणि उपकालवे यांनी एकत्रित असलेली यंत्रणा म्हणजे जलसंपदा यंत्रणा होय.

**७)    म.ज.नि.प्रा. कडे त्याची न्यायिकवत कर्तव्ये पार पाडण्यासाठी कामकाज विनियमन संहिता आहे काय ?**

उत्तर:- यासाठीची कामकाज विनियमन संहिता तयार करण्याचे काम सध्या चालु आहे.